पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८
मा. विधी समिती
कार्यपत्रिका क्रमांक : ६

**सभावृत्तांत**

दिनांक : २० / ०७ / २०१२ वेळ : दुपारी ३ :०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार, दिनांक - २० / ०७ / २०१२ रोजी दुपारी ३:०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेत खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. प्रसाद शेट्टी - सभापती
२) मा. ननवरे जितेंद्र बाबा
३) मा. सुपे आशा रविंद्र
४) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
५) मा. शितोळे शैलजा बाबुराव
६) मा. नेटके सुमन राजेंद्र
७) मा. आल्हाट धनंजय मुरलीधर

या शिवाय मा.भंडारे - प्र.उपनगरसचिव हे अधिकारी उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दखल करुन घेणेत आले.

विषय क्र.३ :- प्रभाग क्रमांक ९४ येथे आरक्षण क्रमांक ३३३ शॉपिंग सेंटर बांधणेबाबत - मा. जितेंद्र ननवरे, मा. आशा सुपे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४ :- प्रभाग क्रमांक ९७ पिंपळे गुरव येथील दापोडी पुलाजवळ तटरक्षक भिंत बांधणेबाबत - मा. जितेंद्र ननवरे, मा. आशा सुपे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५ :- वॉर्ड क्रमांक ११ येथील पुणे - आळंदी रस्ता ते वडमुखवाडी रस्त्यावर सी.डी.वर्क बांधणेबाबत - मा. धनंजय आल्हाट, मा.आशा सुपे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६ :- अतिक्रमण कारवाईस लागणा-या यंत्रसामुग्रीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत - मा. जितेंद्र ननवरे, मा. आशा सुपे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७ :- प्रभाग क्रमांक ३७ येथे ठिकठिकाणी शौचालय बांधणेबाबत - मा. जितेंद्र ननवरे, मा. नितीन लांडगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८ :- भूयारीमार्ग करणेबाबत - मा.नितीन लांडगे, मा.जितेंद्र ननवरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९ :- प्रभाग स्तरावरती १० लाखापर्यंतची मर्यादा २५ लाखापर्यंत करणेबाबत - मा. जितेंद्र ननवरे, मा. आशा सुपे यांचा प्रस्ताव.

----------

खालील प्रमाणे सूचना मांडणेत आली-

सूचक :- मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक :- मा. नितीन लांडगे

पिंपरी चिंचवड शहरातील अनाधिकृत बांधकामांच्या विषयावर शहरातील तीन आमदार विधीमंडळाच्या समोर उपोषणास बसले असल्याने त्यांना पाठींबा देऊन शनिवार दिनांक २१/०७/२०१२ रोजी दुपारी ३.०० पर्यत सभा तहकूब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

मा.सभापती :- पिंपरी चिंचवड शहरातील अनाधिकृत बांधकामांच्या विषयावर शहरातील तीन आमदार विधीमंडळाच्या समोर उपोषणास बसले असल्याने त्यांना पाठींबा देऊन शनिवार दिनांक २१/०७/२०१२ रोजी दुपारी ३.०० पर्यत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( प्रसाद शेट्टी )**
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८
मा. विधी समिती
कार्यपत्रिका क्रमांक : ६

**सभावृत्तांत**

( दिनांक २०/०७/२०१२ ची तहकूब सभा )

दिनांक : २१ / ०७ / २०१२ वेळ : दुपारी ३ :०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची दिनांक २०/०७/२०१२ ची तहकूब सभा शनिवार, दिनांक २१ / ०७ / २०१२ रोजी दुपारी ३:०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेत खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. प्रसाद शेट्टी - सभापती
२) मा. ननवरे जितेंद्र बाबा
३) मा. सुपे आशा रविंद्र
४) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
५) मा. शितोळे शैलजा बाबुराव
६) मा. नेटके सुमन राजेंद्र
७) मा. आल्हाट धनंजय मुरलीधर

या शिवाय मा.मुंढे - सहा.आयुक्त, मा.चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.पाटील - प्रशासन अधिकारी हे अधिकारी उपस्थित होते.

----------

**मा. धनंजय आल्हाट** - मा. विधी समिती ठराव क्रमांक ३० दिनांक ०६/०७/२०१२ मधील मा.धनंजय आल्हाट, मा.विनोद नढे यांचा प्रस्ताव या नंतर चा "वॉर्ड क्र. १४ पासून ते मान्यता देणेत येत आहे " पर्यंतचा सर्व मजकुर वगळून त्या ऐवजी " विषय क्रमांक ३० दप्तरी दाखल करणेत येत आहे" हा मजकूर समाविष्ट करणेची दुरुस्ती करणेत यावी.

मा. विधी समिती ठराव क्रमांक ३० दिनांक ०६/०७/२०१२ मधील मा.धनंजय आल्हाट, मा.विनोद नढे यांचा प्रस्ताव या नंतर चा "वॉर्ड क्र. १४ पासून ते मान्यता देणेत येत आहे " पर्यंतचा सर्व मजकुर वगळून त्या ऐवजी " विषय क्रमांक ३० दप्तरी दाखल करणेत येत आहे " हा मजकूर समाविष्ट करणेत आल्याची दुरुस्ती करण्यात आल्याचे व त्या दुरुस्तीसह दिनांक ०६/०७/२०१२ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्रमांक ५) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्रमांक :- ३५ विषय क्रमांक :- १
दिनांक :- २१/०७/२०१२ विभाग :- जकात
सुचक :- मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक :- मा.नितीन लांडगे
संदर्भ :- मा. महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जकात/१०/कावि/९९/२०१२, दि. १९/०३/२०१२

मा. महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका जकात नियम २००१ चे अनुसूची १ व २ मधील दर समानिकरणाकामी प्रस्तावा सोबत प्रपत्र अ जोडले असून त्यामध्ये प्रपत्र ब च्या यादीप्रमाणे एकूण १८ बाबींच्या नमूद मालावर प्रस्तावित केलेले सुधारित जकात दर कायम करणेस व त्या प्रमाणेचे अनुसुचीबाबत नागरिकांच्या हरकती सुचना मागविणेस मान्यता देणेकामी मा. स्थायी समितीमार्फत मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ३६ विषय क्रमांक :- २
दिनांक :- २१/०७/२०१२ विभाग :- विद्युत - क
सुचक :- मा.नितीन लांडगे अनुमोदक :- मा.सुमन नेटके
संदर्भ :- मा. महापालिका आयुक्त यांचे पत्र क प्रभाग/वि/जा/५०९/२०१२, दि. ०६/०७/२०१२

विषय :- भोसरी विद्युत दाहिनी तीन वर्षाकरिता चालन देखभाल व दुरुस्ती करणेचे कामाचे र.रु. ८,१६,६६७/- इतक्या वाढीव खर्चास ( एकूण र.रु.३७,५६,६६७/- ) सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक :- ३७ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- २१/०७/२०१२
सुचक :- मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक :- मा.आशा सुपे
संदर्भ :- मा. जितेंद्र ननवरे, मा.आशा सुपे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.९४ येथे आरक्षण क्रमांक ३३३ शॉपिंग सेंटर बांधणे ( निविदा क्रमांक G४A/२४/३/२०११-१२) या कामातून प्रभाग क्र. ५८ मध्ये स्थापत्य विषयक कामे करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ३८ विषय क्रमांक :- ४
दिनांक :- २१/०७/२०१२
सुचक :- मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक :- मा.आशा सुपे
संदर्भ :- मा. जितेंद्र ननवरे, मा.आशा सुपे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.९७ पिंपळे गुरव येथील दापोडी पुलाजवळ तटरक्षक भिंत बांधणे ( निविदा क्रमांक - G४B/६/१६४/२०११-१२ ) या कामातून प्रभाग क्र.५७ पिंपळे गुरव या भागातील आवश्यक स्थापत्य विषयक कामे करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ३९ विषय क्रमांक :- ५
दिनांक :- २१/०७/२०१२
सुचक :- मा.धनंजय आल्हाट अनुमोदक :- मा.आशा सुपे
संदर्भ :- मा. धनंजय आल्हाट, मा.आशा सुपे यांचा प्रस्ताव -

वॉर्ड क्र.११ येथील पुणे - आळंदी रस्ता ते वडमुखवाडी रस्त्यावर सी.डी.वर्क बांधणे हे काम काढणेत आलेले आहे परंतु पुणे - आळंदी रस्त्यांचे रुंदीकरण करणेत येणार असल्याने सदर सी.डी.वर्क ताजणेमळा येथील तापकीर वस्तीकडे जाणा-या नाल्यावर करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ४० विषय क्रमांक :- ६
दिनांक :- २१/०७/२०१२
सुचक :- मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक :- मा.आशा सुपे
संदर्भ :- मा. जितेंद्र ननवरे, मा.आशा सुपे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंदाजपत्रक २०१२ - १३ पान क्रमांक १३२ अनु.क्र. ४३ वरील काम अ प्रभागात अतिक्रमण कारवाईसाठी क्रेन, जेसीबी, ट्रक पुरविणे सदर कामासाठी र.रु.५०,००,०००/- ( अक्षरी रक्कम रुपये पन्नास लाख फक्त ) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ४१ विषय क्रमांक :- ७
दिनांक :- २१/०७/२०१२
सुचक :- मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक :- मा. नितीन लांडगे
संदर्भ :- मा. जितेंद्र ननवरे, मा.नितीन लांडगे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्रमांक ३७ येथे महात्मा फुलेनगर मधील लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असून त्या ठिकाणी शौचालयाची कमतरता भासत आहे. तरी ठिकठिकाणी शौचालय बांधणेकामी र.रु.४९,००,०००/- ( अक्षरी र.रु. एकोणपन्नास लाख फक्त)
चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ४२ विषय क्रमांक :- ८
दिनांक :- २१/०७/२०१२
सुचक :- मा. नितीन लांडगे अनुमोदक :- मा. जितेंद्र ननवरे
संदर्भ :- मा.नितीन लांडगे, मा. जितेंद्र ननवरे, यांचा प्रस्ताव -

भोसरी गावठाण प्रभागातील धावडेंवस्ती या ठिकाणी रहात असलेल्या जनतेसाठी त्यांच्या दैनंदिन कामकाजात सुरक्षितता येण्यासाठी त्यांच्या जिविताच्या सुरक्षिततेसाठी ( रस्ता क्रॉसिंग करणेसाठी ) भूयारी मार्ग करणे गरजेचे आहे. तसेच सदर ठिकाणी भैरवनाथ हायस्कूल व कॉलेज आहे. त्या विद्यार्थ्यांच्या व नागरिकांच्या सोयीसाठी तेथे भूयारी मार्ग करणे गरजेचे आहे. तरी सदर भूयारी मार्गासाठी येणा-या र.रु.४९,००,०००/- (अक्षरी र.रु. एकोणपन्नास लाख फक्त ) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ४३ विषय क्रमांक :- ९
दिनांक :- २१/०७/२०१२
सुचक :- मा. जितेंद्र ननवरे अनुमोदक :- मा. आशा सुपे
संदर्भ :- मा. जितेंद्र ननवरे, मा. आशा सुपे यांचा प्रस्ताव -

प्रभाग स्तरावर स्थापत्य, विद्युत, पाणीपुरवठा, आरोग्य, प्रशासन, मलनिःसारण इ. विभागीय कामे करणेत येतात. सद्यस्थितीत प्रभाग स्तरावर प्रभाग अधिकारी यांना १०,००,०००/- पर्यंतच्या प्रशासकीय मान्यता व वित्तीय मंजूरी देणेचा अधिकार आहे. प्रभागाच्या कामकाजाचे व्याप्तीत वाढ झाल्यामुळे खर्च मर्यादा १०,००,०००/- ऐवजी २५,००,०००/- पर्यंत प्रशासकीय मान्यता व वित्तीय मंजूरीचे अधिकार सर्व प्रभाग समित्यांना देणेस मान्यता देणेत यावी अशी मा.स्थायी समिती मार्फत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( प्रसाद शेट्टी )**
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ १०२५ /२०१२
दिनांक - २३ / ०७ / २०१२ चे लगत

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८,

## प्रपत्र - ब

## मा.विधी समिती सभा ठराव क्रमांक ३५ दिनांक २१/०७/२०१२ चे लगत

| अ. क्र. | | वस्तुचे नाव | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| १३ | अ) | सर्व प्रकारची सुकविलेली किंवा जतन केलेली फळे व कवचफळे डबाबंद मासळी, चीज, कन्फेक्शनरी, मुरंबा व जेली, आईसक्रिम, सर्व प्रकारचे पिठूळ अन्न, लोणची, कोको व कोकोच्या बीया, चॉकलेट्स, बिस्किटे व केक, प्राण्यांची पातळ चरबी (लार्ड ) किंवा प्राण्यांची खाद्य चरबी, मावा, दुधाची मलई, चक्का, फळांचे रस, सरबते व सर्व पेये, बेव्हरेजेस (उदा. कोकोकोला, पेप्सी इत्यादी सारखे) ग्लुकोज, डेस्ट्रोज किंवा कोणतीही कलशर्करा (खाद्य तेलाव्यतिरिक्त) तेल्याच्या दुकानातील माल, परिरक्षित किराणामाल, बेकिंग पावछर, सॅकरिन, सर्व प्रकारचे खाद्य रंग व अर्क, इतर सर्व प्रकारचे ग्लुकोज, सातुचे वाळवीलेले सत्व, (माल्ट एक्स्ट्रॅक्ट) मध, पापड, सर्व प्रकारचे वेफर्स, शेवई, कोणत्याही वापरासाठी संस्करण केलेले मांस, स्किमड मिल्क पावडर, निरा व सर्व प्रकारचे अन्न किंवा पेय आणि सर्व प्रकारचे काजू व काजू बिया | ४.०० |
| | ब) | एरिएटेड वॉटर, मिनरल वॉटर, विशुध्द जल | ४.०० |
| ३१ | | फटाके, दारूकाम व त्याचे घटक, सेफ्टी फ्युज | ४.०० |
| ४४ | | सर्व प्रकारचे सिमेंट,सनला (सागोळ) | ४.०० |
| ४५ | | डांबर (कोल टार) अस्फाल्ट, बिटयूमेन, फरसबंदी दगड, मँगनिज,इमरी दगड किंवा खडी, दगडाच्या चिपा (स्टोन चिप्स) दगडाची धातूखळ, आग्रा दगड, इमारती दगड, डांबर मिश्रित धातूखळ, डांबर मिश्रित धातूखळ, डांबर मिश्रित कच (ग्रिट) सिमेंट मिश्रित खडी (तयार कॉंक्रीटचा माल) | ४.०० |
| ४६ | | चकाकी दिलेल्या विटा व फरशा (टाईल्स), संगमरवरी दगड, भटटीच्या विटा, विटा, सर्व प्रकारची छप्परी कौले,पलोअरींग टाईल्स,फरशीच्या लाद्या इ.चायना मोझाईक चिप्स, मोझाईकचा सगमरवरी दगड,मोझाईक किंवा टेरेझोची कौले, चिनी मातीचे पांईप, मातीचे पाईप, सिमेंटचे पाईप, अस्बेस्टॉस सिमेंट पत्रे,सिमेंटच्या कुंडया,नक्षीदार जाळया सारख्या वस्तू,सिमेंट ब्लॉक्स व ग्रॅनाइड | ४.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ५२ | | प्लायवूड, सॉपटबोर्ड, हार्डबोर्ड, मॅसोनाइड किंवा कोणतेही घटक असलेले व कृत्रिम प्रक्रियेने तयार करण्यात आलेले इतर कोणत्याही प्रकारचे लाकूड व त्यापासून तयार करण्यात आलेले इतर कोणत्याही प्रकारचे लाकूड व त्यापासून तयार केलेल्या वस्तू व सर्व प्रकारचे फर्निचर, सनमायका, फॉरमायका आणि सर्व प्रकारचे प्लायवूडस् | ४.०० |
| ५३ | अ) | केसाचे तेल , सुगंधी तेले, सर्व् प्रकारचे सुगंधी द्रव्ये, सेंटस् , अत्तरे, सुगंधीत वस्तू, उदबत्या, सुगंधी रसायने, प्रसाधनगृहांसाठी आवश्यक असणा-या सर्व प्रकारच्या वस्तू, दाढीचे क्रीम, दाढीचा साबण, दंतमंजन, दाताची पेस्ट, पोमेड, फण्या, कंगवे, ब्रश, केसाच्या पिना, ब्रेसेस, गार्टर्स, सस्पेंडर्स, उदा.धूप, लोबान | ४.०० |
| ५३ | क) १ | लेसेस,टेप्स, लाकडी व धातूच्या रिंग्ज,भरतकामाच्या वस्तू, सेल्यूलाईड व सेल्यूलाईडच्या वस्तू, सर्व प्रकारचे मणी, कृत्रीम मोती, बेकेलरइट व बेकेलाइडच्या वस्तू, हस्तीदंत व हाडे यापासून बनविलेल्या वस्तू, सर्व प्रकारची बटणे(शर्ट इ.वस्तूंचे) िकरकोळ जिन्नस, हॅबरडॅशरी, बूट लेसेस ब्लँको, ब्रासो,छत्र्या व छत्र्यांचे सामान, काठया,चाबूक, टेप्स, कॅनव्हासच्या पिशव्या, होल्डॉल्स,प्लेइंग बॉल्स, गोटया, पॉलिश पेपर्स,बुचे,गंध, फिशिंग रॉड आणि इतर फॅन्सी गुडस्, रक्षाबंधनाच्या राख्या | ४.०० |
| ५३ | क(३) | सर्व प्रकारच्या प्लॅस्टीक पिशव्या | ८.०० |
| ५३ | ड) | लाकडी, लोखंडी, पोलादी, वेताचे, प्लॅस्टीक व फायबर इ.सारखे सर्व प्रकारचे फर्निचर | ४.०० |
| ७४ | ई) | संगणक त्यांचे घटक व सुटे भाग व संगणकाच्या मायक्रोचिप्स, कुलिंग सिस्टिम बनवण्यासाठी आयात होणारा माल, फ्लॉपी, सीडी, बॅकअप मशिन, कार्टेज, सर्व प्रकारचे सॉफ्टवेअर अशा व इतर वस्तू. | ४.०० |
| | ह) | मोबाईल, पेजर, सिमकार्ड, सिमकार्ड ॲक्टिवेशन/ रिन्युअल स्लीप कुपन इत्यादी. | ४.०० |
| ७५ | अ) १) | मोटारी, मालमोटारी, सर्व प्रकारची साधने, कार, बसेस, क्रेन, ट्रेलर, टेम्पो, रिक्षा, फोर्कलिफ्ट, एक्सेव्हेटर्स, सर्व प्रकारची प्रवासी साधने, रोडरोलर्स, बुलडोजर्स, ट्रॅक्टर्स, कॉंक्रिट मिक्सर, जीप, सर्व प्रकारच्या वाहनांच्या चॅसीज तसेच विशेष रित्या तरतूद न करण्यात आलेली सर्व प्रकारची देशी व विदेशी वाहने. | ४.०० |
| | | मोटर सायकल, स्कूटर्स, मोपेड्स | |

| | | | |
|---|---|---|---|
| ७६ | अ) | उपकरणे, उपकरण संचा व उपयंत्रे व त्यांचे भाग शिवणयंत्रे व शिवणकाम व विणकामाची एम्ब्रॉयडरी यंत्र, ओव्हर लॉकिंग व इंटरलॉकिंग यंत्र, सर्व प्रकारची सर्व घडयाळे, टंकलेखन यंत्र, इलेक्ट्रॉनिक टंकलेखन यंत्र व त्यांचे सुटे भाग व घटक भाग. | ४.०० |
| ७६ | ब) १) | रेडिओग्राम उपकरण संच, ग्रामोफोन्स, ॲम्प्लिफायर्स, वायरलेस (यंत्र), सर्व प्रकारची संगीत वाद्ये, ऑडिओ-व्हिडिओ कॅसेट्स, मायक्रोफोन्स, व्हिडिओ गेम्स, वॉकमन, टेलिफोन संच, फॅक्स संच, दूरध्वनी संचासाठी वापरण्यात येणारे अंतर्गत साहित्य, लॅपटॉप संच, इंटरनेट आणि वेबसाईट मशीनरी आणि त्यांचे घटक भाग, सुटे भाग आणि पूरक भाग, तयार (रेडिमेड) रेडिओ, टेपरेकॉर्डर दूरदर्शन संच, सर्व प्रकारचे स्पिकर्स, सीडी प्लेअर, डिव्हीडी, व्हिसीडी आणि व्हिसीआर. | ४.०० |
| ७६ | ब) २) | सर्व प्रकारचे रेडिओ, दूरदर्शन संच, सर्व प्रकारचे स्पिकर, साउंड सिस्टिम, टेपरेकॉर्डर, सीडी प्लेअर, डिव्हीडी, व्हिसीडी आणि व्हिसीआर तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे घटक व सुटे भाग तथापि, इतरत्र विशिष्टरित्या नमूद केलेले घटक भाग, सुटे भाग, पूरक भाग वगळून. | ४.०० |
| ८६ | | वरील कोणत्याही बाबीत समाविष्ट न केलेल्या व अनुसूची २ मध्ये विशेषत: सूट देण्यात न आलेल्या माल व वस्तू | ४.०० |
| | | | |

**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८,

### प्रपत्र - ब

### मा.विधी समिती सभा ठराव क्रमांक ३५ दिनांक २१/०७/२०१२ चे लगत

| अ. . | | वस्तुचे ाव | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| १३ | अ) | *सर्व प्रारची सुविलेली िवा जता लेली फळे व वचफळे डबाबंद मासळी, चीज, फेक्शारी, मुरंबा व जेली, आईसिम, सर्व प्रारचे पिठूळ अन्, लोची, ो व ोच्या बीया, चॉलेट्स, बिक्स्टे व , प्रायांची पातळ चरबी (लार्ड ) िवा प्रायांची ाद्य चरबी, मावा, दुधाची मलई, चक्ा, फळांचे रस, सरबते व सर्व पेये, बेव्हरेजेस (उदा. ोोोला, पेप्सी इत्यादी सार) लुोज, डेस्ट्रोज िवा ोतीही लशरा (ाद्य तेलाव्यतिरिक्त) तेल्याच्या दुाातील माल, परिरिता िराामाल, बेि पावछर, सॅरि, सर्व प्रारचे ाद्य रं व अ, इतर सर्व प्रारचे लुोज, सातुचे वाळवीलेले सत्व, (माल्ट एक्स्ट्रॅक्ट) मध, पापड, सर्व प्रारचे वेफर्स, शेवई, ोत्याही वापरासाठी संस्र लेले मांस, कस्मड मिल् पावडर, िरा व सर्व प्रारचे अन िवा पेय आि सर्व प्रारचे ाजू व ाजू बिया* | *४.००* |
| | ब) | *एरिएटेड वॉटर, मिरल वॉटर, विशुध्द जल* | *४.००* |
| *३१* | | *फटा, दारूाम व त्याचे घट, सेफ्टी फ्युज* | *४.००* |
| *४४* | | *सर्व प्रारचे सिमेंट,साला (साािळ)* | *४.००* |
| *४५* | | *डांबर (ोल टार) अस्फाल्ट, बिटयूमो, फरसबंदी दड, मॅाजि,इमरी दड िवा ाडी, दाडाच्या चिपा (स्टोा चिप्स) दाडाची धातूाळ, आा दड, इमारती दड, डांबर मिश्रित धातूाळ, डांबर मिश्रित धातूाळ, डांबर मिश्रित च (िट) सिमेंट मिश्रित ाडी (तयार ॉटचा माल)* | *४.००* |

| | | | |
|---|---|---|---|
| ४६ | | चकाकी दिलेल्या विटा व फरशा (टाईल्स), संगमरवरी दगड, भटटीच्या विटा, विटा, सर्व प्रकारची छप्परी कौले,फ्लोअरींग टाईल्स,फरशीच्या लाद्या इ.चायना मोझाईक चिप्स, मोझाईकचा संगमरवरी दगड,मोझाईक किंवा टेरेझोची कौले, चिनी मातीचे पाईप, मातीचे पाईप, सिमेंटचे पाईप, अस्बेस्टॉस सिमेंट पत्रे,सिमेंटच्या कुंडया,नक्षीदार जाळया सारख्या वस्तू,सिमेंट ब्लॉक्स व ग्रॅनाइड | ४.०० |
| ५२ | | प्लायवूड, सॉपटबोर्ड, हार्डबोर्ड, मॅसोनाइड किंवा कोणतेही घटक असलेले व कृत्रिम प्रक्रियेने तयार करण्यात आलेले इतर कोणत्याही प्रकारचे लाकूड व त्यापासून तयार करण्यात आलेले इतर कोणत्याही प्रकारचे लाकूड व त्यापासून तयार केलेल्या वस्तू व सर्व प्रकारचे फर्निचर, सनमायका, फॉरमायका आणि सर्व प्रकारचे प्लायवूडस् | ४.०० |
| ५३ | अ) | केसाचे तेल , सुगंधी तेले, सर्व् प्रकारचे सुगंधी द्रव्ये, सेंटस् , अत्तारे, सुगंधीत वस्तू, उदबत्या, सुगंधी रसायने, प्रसाधनगृहांसाठी आवश्यक असणा-या सर्व प्रकारच्या वस्तू, दाढीचे क्रीम, दाढीचा साबण, दंतमंजन, दाताची पेस्ट, पोमेड, फण्या, कंगवे, ब्रश, केसाच्या पिना, ब्रेसेस, गार्टर्स, सस्पेंडर्स, उदा.धूप, लोबान | ४.०० |
| ५३ | क) १ | लेसेस,टेप्स, लाकडी व धातूच्या रिंग्ज,भरतकामाच्या वस्तू, सेल्यूलाईड व सेल्यूलाईडच्या वस्तू, सर्व प्रकारचे मणी, कृत्रीम मोती, बेकेलाइट व बेकेलाइडच्या वस्तू, हस्तीदंत व हाडे यापासून बनविलेल्या वस्तू, सर्व प्रकारची बटणे(शर्ट इ.वस्तूंचे) किरकोळ जिन्नस, हॅबरडॅशरी, बूट लेसेस ब्लँको, ब्रासो,छत्र्या व छत्र्यांचे सामान, काठया,चाबूक, टेप्स, कॅन्व्हासच्या पिशव्या, होल्डॉल्स,प्लेइंग बॉल्स, गोटया, पॉलिश पेपर्स,बुचे,गंध, फिशिंग रॉड आणि इतर फॅन्सी गुडस्, रक्षाबंधाच्या राख्या | ४.०० |
| ५३ | क (३) | सर्व प्रकारच्या प्लॅस्टीक पिशव्या | ८.०० |
| ५३ | ड) | लाकडी, लोखंडी, पोलादी, वेताचे, प्लॅस्टीक व फायबर इ.सारखी सर्व प्रकारचे फर्निचर | ४.०० |
| ७४ | ई) | संगणक त्यांचे घटक व सुटे भाग व संगणकाच्या मायक्रोचिप्स, कुलिंग सिक्स्टम बनवण्यासाठी आयात होणारा माल, फ्लॉपी, सीडी, बॅकअप मशिन, कार्टेज, सर्व प्रकारचे सॉफ्टवेअर अशा व इतर वस्तू. | ४.०० |

**सभापती**
*विधी समिती*
*पिंपरी चिंचवड महानगरपालिका*
*पिंपरी - ४११ ०१८.*